**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र आजपासून सुरू, पहिल्याच दिवशी लोकसभेत पीएमश्री योजनेवरून तर राज्यसभेत स्थगन प्रस्ताव उपाध्यक्षांनी फेटाळल्यामुळे नाराज विरोधकांचा सभात्याग

- महाराष्ट्राचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार

- बनावट दारु प्रकरणाच्या चौकशीसाठी छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या मुलाच्या घरावर ईडीचे छापे

- ललित मोदी यांचा पासपोर्ट रद्द करण्याचे वानुआटू देशाचे प्रधानमंत्री जोथम नापट यांचे आदेश

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाने मिळवलेल्या विजयानंतर सर्वत्र जल्लोष सुरू / राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून संघाचं अभिनंदन

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र आजपासून सुरू झालं. पीएम श्री योजनेच्या अंमलबजावणीबाबत तमिळनाडू सरकारवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलेल्या टिप्पणीच्या निषेधात द्रमुक सदस्यांनी गदारोळ केला. केंद्रीय शिक्षण मंडळाच्या शाळांमधे पीएम श्री योजना लागू करण्याला तमिळनाडू सरकारने आधी संमती दिली मात्र आता घूमजाव करुन राज्यसरकार विद्यार्थ्यांचं नुकसान करीत आहे, अशी टीका प्रधान यांनी केली होती. त्याच्या निषेधात झालेल्या घोषणाबाजी मुळे सभागृहाचं कामकाज अर्धा तास तहकूब करण्यात आलं. मतदार

याद्यांमधे घोटाळे झाल्याचा आरोप करत त्याविषयी चर्चेची मागणी आज विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केली.

अधिवेशनाच्या या सत्रात गदारोळाच्या पार्श्वभूमीवर सभापती ओम बिरला यांनी कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलावली होती. प्रश्नोत्तर काळ सुरळीत चालावा या करता सहकार्य करण्याचं आवाहन, सभापतींनी सदस्यांना केलं. अधिवेशनाचं हे सत्र ४ एप्रिल पर्यंत चालणार असून त्यात २० बैठका होतील. रेल्वे, कृषी आणि जलशक्ती मंत्रालयाच्या मागण्यांवर प्रामुख्याने चर्चा होणार आहे. मणिपूरमधे राष्ट्रपती राजवट, मणिपूरचा अर्थसंकल्प, वक्फ सुधारणा विधेयक इत्यादी विधेयकं मंजुरीसाठी मांडली जाणार आहेत.

मतदारांना एकापेक्षा अधिक ओळखपत्र जारी होणं, अमेरिकेकडून आर्थिक मदत, मतदानाच्या प्रमाणाविषयीचे मुद्दे, इत्यादी विविध मुद्यांवर राज्यसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेले स्थगन प्रस्ताव उपाध्यक्षांनी फेटाळल्यामुळे नाराज झालेल्या सदस्यांनी सभात्याग केला. सरकार कोणत्याही मुद्द्यावर नियमांनुसार चर्चेला तयार असल्याचं, केंद्रीय मंत्री जे. पी नड्डा यांनी सांगितलं. मात्र विरोधकांचं त्यानं समाधान झालं नाही. विरोधकांचा सभात्याग हा संविधानाची पायमल्ली असल्याची, टीका नड्डा यांनी केली.

**<><><><><>**

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार आहे. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प असून अर्थमंत्री अजित पवार यांचा ११वा अर्थसंकल्प आहे. ते आधी विधानसभेत आणि त्यानंतर विधानपरिषदेत सादर करतील. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवण्यासह काही महत्त्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

कांद्यावरचं २० टक्के निर्यात शुल्क कमी करण्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून एक निश्चित धोरण आखू आणि याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिलं. छगन भुजबळ, रोहित पवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात याबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. कांद्याला २ हजार २५० रुपये किमान हमीभाव द्यावा अशी मागणी भुजबळ यांनी केली.

… ते म्हणाले…

**होल्ड बाईट- छगन भुजबळ ( १६ सेकंद )**

यावर या मागणीसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल, असं सरकारनं सांगितलं. कांद्याची देशांतर्गत निर्यात वाढवण्याचा तसंच कांदा चाळी वाढवण्याचा प्रयत्न करू, असं उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बनावट दारु प्रकरणाच्या चौकशीसाठी ईडीनं छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते भूपेश बघेल यांच्या मुलाच्या घरावर आज छापे टाकले आहेत. छत्तीसगडमधील दुर्ग जिल्ह्यातील १४ ठिकाणी ईडी तपास करत आहे. भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेल याच्यासह त्याचा सहकारी लक्ष्मी नारायण बन्सल आणि काही इतरांवर मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार ईडीनं छापे टाकले असल्याचं सूत्रांनी सांगितलं. या चौकशीअंतर्गत, ईडीनं आतापर्यंत विविध आरोपींची सुमारे २०५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

**<><><><><>**

ललित मोदी यांचा पासपोर्ट रद्द करण्याचे आदेश वानुआतू देशाचे प्रधानमंत्री जोथम नापट यांनी दिले आहेत. वानुआतू हे दक्षिण पॅसिफिक महासागरातल्या बेटावरचा देश आहे. मोदी यांनी वानुआतूचं नागरिकत्व मिळवलं आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये मोदी यांच्यावरच्या आरोपांविषयी खुलासे झाल्यानंतर

जोथम नापट यांनी पासपोर्ट रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, ललित मोदी यांनी लंडनमधल्या भारतीय उच्चायुक्तालयात त्यांचा भारतीय पासपोर्ट परत करण्यासाठी अर्ज केल्याची माहिती भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. सध्याच्या नियम आणि प्रक्रियांनुसार या विनंतीचा विचार केला जाईल, असं परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं आहे. ललित मोदी यांच्यावर आयपीएलच्या अध्यक्षपदावर असताना कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.

<><><><><>

आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाने मिळवलेल्या विजयानंतर सर्वत्र जल्लोष सुरू आहे. दुबई इथं काल झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडवर चार गडी राखून विजय मिळवला आणि तिसऱ्यांदा या करंडकावर नाव कोरलं. या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या संघाने निर्धारित ५० षटकांत ७ बाद २५१ धावा केल्या. भारतीय संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात २५४ धावा करत विजेतेपद पटकावलं. विशेष म्हणजे तीन वेळा हा करंडक जिंकणारा भारत हा पहिला देश ठरला आहे. यापूर्वी २००२ आणि २०१३ मध्ये भारतीय संघानं ही कामगिरी केली होती. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याला सामनावीर तर न्यूझीलंडचा फलंदाज रचिन रवींद्र याला मालिकावीर म्हणून गौरवण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विजेत्या संघाचं अभिनंदन केलं आहे. महाराष्ट्र विधानसभेत आयसीसी चँपियन्स ट्राफी २०२५ मध्ये अजिंक्य पद पटकावणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहात मांडला. तो एकमतानं संमत करण्यात आला. प्रशिक्षक गौतम गंभीर, कर्णधार रोहित शर्मा यांच्यासह संघातल्या सर्व खेळाडूंचं सभागृहानं अभिनंदन केलं.

<><><><><>

२२ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएल स्पर्धेदरम्यान तंबाखू आणि मद्यापानाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या प्रोत्साहन देणाऱ्या सर्व जाहिरातींवर बंदी घालण्याच्या सूचना आरोग्य मंत्रालयानं आयपीएलला दिल्या आहेत. देशाच्या तरुणाईचे आदर्श असलेल्या क्रिकेटपटूंनी अशा कोणत्याही उत्पादनाची जाहिरात करणं योग्य नाही, असं मंत्रालयानं आयपीएलच्या अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

हॉकी इंडियानं सातव्या वार्षिक पुरस्कारांसाठी १२ कोटी रुपयांच्या विक्रमी निधीची घोषणा केली आहे. आठ विभागांमध्ये एकंदर ३२ खेळाडूंचं नामांकन या पुरस्कारांसाठी झालं आहे. २०२४च्या हंगामात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या हॉकीपटूंचा सन्मान येत्या शनिवारी नवी दिल्लीत होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात केला जाईल. यावेळी सर्वोत्कृष्ट महिला आणि पुरुष हॉकीपटूला दिला जाणारा प्रतिष्ठेचा बलबीर सिंह सीनिअर पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

<><><><><>

मध्य प्रदेशातल्या सिधी जिल्ह्यात झालेल्या रस्ते अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला असून १३ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी काही जणांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींवर रीवा वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु आहेत.  मृतांमध्ये ५ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आज पहाटे एक ट्रक उलटून झालेल्या अपघातात चार कामगारांचा मृत्यू झाला तर १३ जण जखमी झाले आहेत. तर जखमींवर सरकारी रुग्णालय आणि इतर वैद्यकीय केंद्रांमध्ये उपचार सुरु आहेत.

//<><><><><>//